
नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १८/०६/२०२५ (बुधवार)

## सावनेर उपविभागात रेकॉर्डवरील ६८ गुन्हेगारांची घेण्यात आली आरोपी परेड, आणि पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत राबविण्यात आले कोबींग ऑपरेशन

श्री अनिल म्हस्के, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक १७/०६/२०२५ रोजी सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर, कळमेश्वर, खापा, केळवद येथे पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी रेकॉर्डवरील गुन्हेगारांची आरोपी परेड घेतली. सावनेर उपविभागाअंतर्गत एकुण ६८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. तसेच दिनांक १७/०६/२०२५ चे २१:०० वाजता ते दिनांक १८/०६/२०२५ चे ०४:०० वाजता दरम्यान पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत पहीलेपार, टाउन बीट येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबींग ऑपरेशन श्री अनिल म्हस्के, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी,सावनेर विभाग यांच्या नेतृत्वात करण्यात आले. कोबींग ऑपरेशन दरम्यान पोलीस स्टेशन सावनेर येथील अधिकारी अंमलदार यांच्यासह दंगा नियंत्रण पथकाचे पोलीस अंमलदार हजर होते. रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली.









## कन्हान उपविभागात पोलीस स्टेशन खापरखेडा येथे रेकॉर्डवरील ३५ गुन्हेगारांची घेण्यात आली आरोपी परेड आणि राबविण्यात आले कोबींग ऑपरेशन

श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक १७/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन खापरखेडा येथे रेकॉर्डवरील ३५ गुन्हेगारांची आरोपी परेड घेण्यात आली. तसेच दिनांक १७/०६/२०२५ चे २१:०० वाजता ते दिनांक १८/०६/२०२५ चे ०४:०० वाजता दरम्यान पोलीस स्टेशन खापरखेडा अंतर्गत वलणी, सिल्लेवाडा आणि चनकापुर येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबींग ऑपरेशन श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग यांच्या नेतृत्वात करण्यात आले. कोबींग ऑपरेशन दरम्यान पोलीस स्टेशन खापरखेडा येथील

अधिकारी , अंमलदार यांच्यासह दंगा नियंत्रण पथकाचे पोलीस अंमलदार हजर होते. रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली.





## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक १७/०६/२०२५ रोजी मौदा पोलीस पो.स्टे. हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, धाामणगाव शिवारात सांड नदीच्या पात्रात एक इसम ट्रक्टर च्या ट्राली मध्ये घमेला पावडयाने रेती भरत आहे. अशी माहिति मिळाल्याने मौदा पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन पाहणी केली असता, **आरोपी नामे पवन अर्जुन चौधरी, वय ३० वर्षे, रा. धामणगाव मौदा, हा त्याचे ताब्यातील विना क्रमांकाच्या ट्रक्टर च्या ट्रॉली मध्ये रेती भरताना मिळुन आला.** पोलीसांनी आरोपीला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे कडे कोणताही परवाना नसल्याबाबत महीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** विना क्रमांकाच्या ट्रक्टर व ट्रॉली किंमती

६,००,०००/— रूपये **व २)** १ ब्रास रेती किंमती ५,०००/— रूपये आणि  असा एकुण ६,०५,०००/रूपयेचा माल जप्त केला.

**वाहन चालक आरोपी नामे पवन अर्जुन चौधरी, वय ३० वर्षे, रा. धामणगाव, मौदा याच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे  कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## उपविभागिय पोलीस अधिकारी ,नागपुर विभाग यांची कामगिरी

दिनांक १८/०६/२०२५ रोजी श्री दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी,नागपुर विभाग हे रात्री जिल्हागस्तीवर असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस स्टेशन बेला अंतर्गत मौजा पिंपरा येथे नांद नदीचे पात्रातुन पुलाजवळुन काही इसम अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून रेती ट्रॅक्टर मध्ये भरत आहे.  मिळालेल्या माहीतीच्या आधारे  श्री. दिपक अग्रवाल हे त्यांच्या पथकासह तात्काळ घटनास्थळी पोहचले असता पोलीसांना ४ इसम अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून रेती ट्रॅक्टर मध्ये भरतांना दिसुन आले. परंतु पोलीसांना पाहुन सर्व आरोपी वाहन जागीच सोडुन पळुन गेले. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये रेती मिळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष वहनामधुन १) १  ब्रास रेती किंमती ५,०००/— रूपये आणि २) ट्रॅक्टर व क्रमांक एम. एच. ३२ टी.सी. ०२६ ट्रॉलीसहीत  किंमती १२,००,०००/— रूपये असा एकुण **१२,०५,०००/—रूपया**चा मुददेमाल जप्त केला आहे. पोलीसांनी सदर प्रकरणी पळुन गेलेल्या इसमांबाबत चौकशी केली असता त्यांची नावे **आरोपी क्रं १) वाहन चालक नामे सुनिल ,वय ४५ वर्षे, रा सालईराणी ता उमरेड जि नागपुर, आणि त्याचे साथीदार २) मारोती मांगरूळकर, वय ५२ वर्षे, ३) सुशिल सुधाकर भेंडे, वय ३६ वर्षे, ४)नरेश झितरूजी सोरते, वय ३७ वर्षे, आरोपी क्रं २ ते ४ राहणार पिंपरा ता.उमरेड, जि. नागपुर. आणि आरोपी क्रं ५) ट्रॅक्टर मालक नामे विलास मुळे, वय ४२ वर्षे, रा. बेला अशी माहीती प्राप्त झाली.**

**सदर प्रकरणी वर नमुद आरोपी क्रं १ ते ५ यांच्या विरूध्द पोस्टे बेला येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## हुंडयासाठी आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्यांवर गुन्हा नोंद
## आरोपी अटक

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :— दिनांक १७/०६/२०२५ रोजी फिर्यादी नामे रामदास गुलाबराव मेघरे, रा. शेकापुर (बाई) ता. हिंगणघाट, जि. वर्धा यांनी **एमआयडीसी बोरी** पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली की, फिर्यादीची मुलगी **मृतक नामे चैताली मनोज कांबडी,** वय २१ वर्षे, रा. वार्ड क्र ०३, टाकळघाट, ता. हींगणा हीला आरोपी क्रं १) मृतकचे पती नामे **मनोज रमेशराव कांबडी, वय ३० वर्ष, धंदा—पानठेला ,रा. वार्ड क्र ०३. टाकळघाट ता हिंगणा आणि आरोपी क्रं २) मृतकची सासु यांनी लग्नात हुंडा कमी दिला आणि मृतक हीला मुल बाळ होत नाही या कारणावरून तिचा शारीरीक व मानसिक छळ केला व तीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले** म्हणुन दिनांक १६/०६/२०२५ रोजी मृतक चैताली हीने तिच्या सासरी टाकळघाट येथे आत्महत्या केली. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे कलम ८०, ८५, १०८, ३(५) भा.न्या.स. सह कलम ३ हुंडाबळी अधिनियम १९६१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नमुद आरोपीतांना एमआयडीसी बोरी पोलीसांनी अटक केली आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने